RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १२, अंक १८] शुक्रवार, जानेवारी ३०, २०२६/माघ १०, शके १९४७ [पृष्ठे ३ किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ६९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक–अ आणि एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक आरोग्य विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, दहावा मजला, मुंबई ४०० ००१,

दिनांक ३० जानेवारी, २०२६.

**अधिसूचना**

**कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८.**

क्रमांक PHD-१२०१६/३/२०२५-PHD (R.K.V.2).— कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाशी विचारविनिमय करून व केंद्र सरकारच्या मान्यतेने महाराष्ट्र शासन आस्थापनांमध्ये नोकरीस असलेल्या व्यक्तींच्या संख्येच्या बाबतीत याबाबतीत निर्गमित केलेल्या आधीच्या सर्व अधिसूचनांचे अंशतः अधिक्रमण करून, उक्त पोट-कलम (५) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या सर्व तरतुदी, ज्या दिनांकास, खालील **अनुसूचीमध्ये** विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आस्थापनांच्या वर्गाना लागू असतील तो दिनांक २८ ऑगस्ट, २०२५ याद्वारे, नियत करीत आहे :-

## अनुसूची

| आस्थापनांचे वर्णन (१) | आस्थापना ज्या क्षेत्रात स्थित आहे ती क्षेत्र (२) |
|---|---|
| मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी ज्यांमध्ये दहा किंवा अधिक व्यक्ती नोकरीस आहेत किंवा होत्या अशा पुढील आस्थापना,-<br>१. शैक्षणिक संस्था (व्यक्ती, विश्वस्त, सोसायट्या किंवा इतर संघटना यांद्वारे चालविल्या जाणाऱ्या सार्वजनिक, खासगी, अनुदानित किंवा अंशतः अनुदानित संस्था)<br>२. वैद्यकीय संस्था (निगम, संयुक्त क्षेत्र, विश्वस्त, धर्मदाय व खासगी मालकीची रुग्णालये, नर्सिंग होम्स, रोगनिदान केंद्र, विकृतिचिकित्सा प्रयोगशाळा) | ज्या क्षेत्रांमध्ये, कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) याच्या तरतुदी, या अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये अगोदरच अंमलात आणलेल्या आहेत ती सर्व क्षेत्रे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रकांत विभूते,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Complex Building, 10th Floor, Mumbai 400 001,

Dated the 30th January, 2026.

*NOTIFICATION*

EMPLOYEES' STATE INSURANCE ACT, 1948.

No. PHD-12016/3/2025-PHD (R.K.V.2).— In exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 1 of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948), in its application to the State of Maharashtra and in partial supersession of all earlier notifications issued in this behalf with respect to the number of persons employed in establishments, the Government of Maharashtra, in consultation with the Employees' State Insurance Corporation and with the approval of the Central Government, after giving one month's notice as required by said sub-section (*5*), hereby appoints the 28th August, 2025, to be the date on which the provisions of the said Act shall extend to the classes of establishments as specified in the *Schedule* below namely :—

*Schedule*

| Description of Establishments (1) | Areas in which the Establishments are situated (2) |
|---|---|
| The following establishments wherein ten or more persons are employed, or were employed on any day of the preceding twelve months, namely :-<br>1. Educational Institution (including public, private, aided or partially aided, run by individuals, trustees, societies or other organization.)<br>2. Medical Institutions (including Corporate, Joint Sector, Trust, Charitable and Private Ownership Hospitals, Nursing Homes, Diagnostic Centers, Pathological Lab). | All areas where provisions of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948) have already been brought into force under sub-section (*3*) of section 1 of the said Act. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRAKANT VIBHUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.